# <u>योजनेचे नावः- स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना</u>

**<u>योजनेचे उद्‌दिष्टः</u>-** ग्रामीण भागातील गरीब कुटूंबांना स्वयंरोजगारासाठी बँकेतर्फे कर्ज व शासनातर्फे अनुदान देऊन त्यांचे उत्पन्नात भरीव वाढ करुन त्यांना एका विशिष्ट कालावधीत दारिद्रय रेषेच्या वर आणणे हा उद्येश आहे. हे साध्य करण्यास सामाजिक चहवळीद्वारे गरीब कुटूंबांना एकत्र आणणे व त्यांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करणे, त्यांना मुलभूत व व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन सक्षमीकरण करणे, त्यांना उत्पन्न देणारी मत्ता देणे व बचत गटांच्या सहभागातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करणे हे या योजनेचे उद्यिष्ट आहे.

**२) <u>योजनेचे स्वरुप</u> :-** योजने अंतर्गत ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटांना व वैयक्तीक लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरीता सहाय्य दिले जाते.